# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक-११ जून २०१४

## राज्यातील सर्व विद्यापीठातील अधिका-यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

## मुंबई विद्यापीठातर्फे कार्यक्रमाचे आयोजन

मुंबई- राज्यातील सर्व विद्यापीठातील उपकुलसचिव आणि सहाय्यक कुलसचिवांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन मुंबई विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.राज्यातील सर्व कृषी आणि अकृषी विद्यापीठातील प्रत्येकी उपकुलसचिव आणि सहाय्यक कुलसचिव असे दोन अधिकारी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर आणि तज्ज्ञाकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

१३ आणि १४ सप्टेंबर २०१४ या रोजी या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन मुंबई विद्यापीठात केले जाणार आहे.या कार्यक्रमामध्ये सहभागी होणा-या अधिका-यांची राहण्याची सोय मुंबई विद्यापीठातर्फे केली जाणार आहे.या कार्यक्रमात सहभागी होणा-या अधिका-यांना देश आणि राज्यपातळीवरील तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात २० विद्यापीठातील ४० अधिकारी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ५०० रुपये नोंदणी शुल्क आकारण्यात येणार आहे.

लीलाधर बन्सोड,

उपकुलसचिव (जनसंपर्क)